Range Forest Office (Prot.) Vikramgad
Tal-Vikramgad Dist-Palghar
Tel- 02520-240330, 240331
E-mail rfovgad@gmail.com

वनक्षेत्रपाल विक्रमगड (प्रा)
यांचे कार्यालय
विक्रमगड ता.विक्रमगड जि.पालघर
दुरध्वनी क्र.०२५२० -२४०३३० , २४०३३१
E-mail rfovgad @gmail .com

# भारतीय वनअधिनियम १९२७ नुसार नोटीस

विषय:- चर्चेसाठी उपस्थित राहील्याबद्दल व तेथील आपल्या आक्षेपार्ह वर्तनाबाबत.

जा.क्र /गुन्हे/ ११७५ /सन-२०१८- १९
विक्रमगड-४०१ ६०५ दि. २४.१०.२०१८.

प्रति,
तहसिलदार विक्रमगड

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, दिनांक २४.१०.२०१८ रोजी निम्नस्वाक्षरीकर्ते दुपारी १२.३० वाजता च्या सुमारास आपल्या कार्यालयामध्ये आपले कार्यालयाचे पत्र क्र./कात-१९/टे-१/MAG/कावि-३५२/१८ दिनांक २०.१०.२०१८ अन्वये चर्चेसाठी उपस्थित राहीले असता आपण अतिशय उध्दट आणि उर्मट भाषेत विचारणा केली की, तुम्ही उशिरा का केला ? तेव्हा निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी आपणांस सर्वांसमोर सांगितले की एका वनगुन्हयामध्ये ३ आरोपींना अटक केली असून त्यात त्यांना वनकोठडी मिळालेली असून त्याचा तपास करणे हे माझे आद्यकर्तव्य आहे. निम्नस्वाक्षरीकर्ते सदर आरोपींना घेऊन शिळ (अवचितपाडा) येथे स्टाफसह पुढिल तपासकामी गेले होते. सदर क्षेत्र विस्तृत स्वरुपात पसरलेले होते व त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गवत असल्याने तोडलेल्या झाडांची बुडे शोधण्यास वेळ लागत होता. तसेच सदर वनगुन्हयाचा तपास पुर्ण न करता निम्नस्वाक्षरीकर्ते सदरच्या मिटींगला हजर राहणेकामी त्वरीत निघून आले म्हणून त्यांना जवळपास अर्धा तासाचा वरील कारणामुळे उशिर झाला असे सांगितले. सदर गुन्हयात पुढिल तपास न झाल्या कारणाने आरोपींना पुनश्च: एकदा सात दिवसांची वनकोठडी मागीतली होती परंतु मा. न्यायालयाने सदर आरोपींना जामिनावर सोडल्या कारणाने सदर गुन्हयाचा तपास अपुर्ण राहिला असून त्यास आपणच जबाबदार आहात. तसेच या घटनेमुळे निम्नस्वाक्षरीकर्ते व त्यांचे कनिष्ट कर्मचारी यांचा मौल्यवान शासकिय कामाचा वेळ व शासनाचा पैसा व्यपगत होणार आहे. निम्नस्वाक्षरीकर्ते यांचेकडे विक्रमगड तालुक्यातील व जव्हार तालुक्यातील मिळून बरेच वनक्षेत्र त्यांच्या कार्यक्षेत्रात येते.

आपण वरील गोष्ट पुर्णपणे ऐकुण घेण्याच्या मनस्थितीत नव्हता. उलट आपण निम्नस्वाक्षरीकर्ते यांच्याशी मी या तालुक्याचा दंडाधिकारी आहे. माझ्यापेक्षा या तालुकयात कोणीही मोठा नाही. दंडाधिकाऱ्याशी आपण असे कसे काय बोलु शकता? आपणावर मी शांतता भंग केल्या प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याशी बोलून प्रस्ताव सादर करेल अशा प्रकारची प्रशासकियदृष्टया न शोभणारी भाषा व अधिकारपदाचा गैरवापर अज्ञानाने व विकृत मनोवृत्तीने करत असल्याचे दिसून येते. आपण आपलेकडील पत्र क्र./कात-१९/टे-१/MAG/कावि-३५२/१८ दिनांक २०.१०.२०१८ अन्वये जे पत्र दिले आहे, त्यामध्ये आपण प्रतिनिधी पाठवू नये असे म्हटले आहे आणि आपण निम्नस्वाक्षरीकार यांना प्रतिनिधी का पाठवला नाही अशा प्रकारची विचारणा सर्वांच्या समक्ष अतिशय उर्मठ भाषेत तालुक्याचा प्रशासकिय प्रमुख या नात्याने करणे योग्य नव्हते, मात्र आपण लेखी



Scanned by CamScanner

स्वरुपात वरील पत्रान्वये स्वत: उपस्थित रहावे, प्रतिनिधी पाठवू नये असे कळविले, अशा प्रकारची विरोधाभासयुक्त कृती करुन आपण आपल्या स्वैराचारी मनाने मनमानी करुन शासकिय अधिकारी व कर्मचारी यांचेवर विनाकारण दबाव आणून त्रास देत आहात. यापुर्वी देखील निम्नस्वाक्षरीकर्ते यांचे काहीही संबंध नसतांना आपण आपली जबाबदारी झटकून मोकळे होण्यासाठी विविध राजकीय प्रसंगी निम्नस्वाक्षरीकर्ते यांना बोलावून वेठीस धरता व कोणत्याही कामाशिवाय शासनाचा वेळ व पैसा वाया घालवून निम्नस्वाक्षरीकर्ते यांना तासनतास बसवून ठेवता. निम्नस्वाक्षरीकर्ते यांना महाराष्ट्र फॉरेस्ट मॅन्युअल २०१४ प्रमाणे निर्धारित केलेल्या जबाबदाऱ्या पार पाडता येत नाहीत, या कारणास्तव वनविभागातील वरीष्ठांच्या रोषाला सामोरे जावे लागते म्हणून आपण शासकिय कामात अडथळा आणत असल्या कारणास्तव आपणा विरोधात संबंधित यंत्रणेकडे तक्रार देऊन गुन्हा का नोंदविण्यात येऊ नये? तसेच आपले हे अशा प्रकारचे वर्तन भारतीय वनअधिनियम कलम २६ मधील पोटकलम ४ अन्वये देखिल गुन्हयास पात्र ठरते.

वस्तुत: मा. न्यायालयाच्या कामात कोणताही विलंब न लावता आरोपी ताब्यात असतांना प्रथम प्राधान्याने गुन्हयाचा तपास करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र वननियमावली २०१४ मधील नियम ७९ अन्वये वनरक्षकाने, महसूल किंवा पोलीस अधिकाऱ्याकडे हजर होण्यासाठी आपले नियतक्षेत्र सोडू नये असा नियम आहे. तरी आपण आपला प्रतिनिधी का पाठवला नाही असे प्रत्येक मिटींग वेळी मौखिकरित्या विचारणा करता व निम्नस्वाक्षरीकार यांना बेकायदेशीर कृती करण्यासाठी प्रवृत्त करता.

वनगुन्हा क्र. एम ९/२०१८-१९ वनगुन्हायामध्ये जवळपास ४ लाख रुपयांची वृक्ष तोड झाल्याचे प्राथमिक तपासणी अंती दिसून येत आहे. आपल्या अशा प्रकारच्या आपल्या वर्तणुकीमुळे तपासकामी अडथळा निर्माण होत असून सदर गुन्हयास आपण प्रोत्साहन देत आहात. सदर गुन्हा भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१ ब अन्वये दखलपात्र व अजामीनपात्र असून तो महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम १९६४ चे कलम ३ अन्वये जबरी दंडास पात्र होणारा आहे. तरी आपण भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ६६ अन्वये वन अपराध करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल आपणांस सदर गुन्हयात सहआरोपी का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा नोटीस प्राप्त होताच तीन दिवसाच्या आत निम्नस्वाक्षरीकार यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून खुलासा सादर करावा. अन्यथा आपले काहीएक म्हणणे नाही असे गृहीत धरुन पुढिल कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल

**कार्यालयाचा पत्ता :-**

वनक्षेत्र कार्यालय विक्रमगड,
पोलीस स्टेशन समोर,
तलाठी ऑफिसच्या बाजुला,
ता. विक्रमगड जि. पालघर

(डी.एन.तोंडे)
वनक्षेत्रपाल विक्रमगड(प्रा)

प्रत- मा. उपवनसंरक्षक जव्हार वनविभाग जव्हार यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत- मा. सहा. वनसंरक्षक (वनीकरण व वन्यजीव) वाडा यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत- मा. पोलीस निरीक्षक विक्रमगड यांना माहितीसाठी तथा पुढिल कार्यवाहीसाठी सविनय सादर

Scanned by CamScanner